बुधवार, ३० नोव्हेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक १३३

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ४ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


पनवेल मनपातर्फे गोवर रुबेलाबाबत जनजागृती/२

रायगडात यंदा २५ हजार हेक्टरवर रब्बीची लागवड/३

भाज्यांची आवक वाढली; दर ५० टक्क्यांनी उतरले/४


## महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी आज सुनावणी



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी बुधवारी (दि. ३०) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर दोन्ही राज्यांच्या सीमेवर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांची बैठक घेतली. राज्य सरकारने मंत्री चंद्रकांत पाटील व शंभूराज देसाई यांची समिती नेमली असून ते न्यायालयीन प्रक्रियेसंदर्भात समन्वय साधणार आहेत. कर्नाटक सरकारने सोलापूर, अक्कलकोट आणि जतमधील ४० गावांवर हक्क सांगितला असला तरी एकही गाव कर्नाटकमध्ये जाऊ दिले जाणार नाही, असे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे.

# आरे कारशेडमधील अडथळे दूर

## सरकारच्या निर्णयाला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुंबईतील आरे येथे मेट्रो कारशेड उभारण्याबाबत महाराष्ट्र सरकारने घेतलेल्या निर्णयाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. कारशेडविरोधातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि. २९) फेटाळून लावली. त्यामुळे महाविकास आघाडीला धक्का बसला आहे.

विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना त्यांनी आरे येथे मेट्रो कारशेड उभारण्याचा निर्णय घेतला होता, मात्र त्यानंतर सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारने हे मेट्रो कारशेड कांजूरमार्ग येथे उभारण्याचा निर्णय घेतला, पण अलीकडेच शिवसेनेचे वरिष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी उठाव केल्याने राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळले आणि शिंदे-फडणवीस सरकार अस्तित्वात आले. राज्यात सत्तांतर घडल्यानंतर नव्या सरकारने पुन्हा आरे येथेच कारशेड उभारण्याचा निर्णय घेतला. महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाला स्थगिती देण्यात यावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती, मात्र ही याचिका न्यायालयाने फेटाळली.

याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाने एमएमआरसीएलला आरे येथील झाडे तोडण्याबाबतच्या अर्जाचा 'ट्री ऑथोरिटी'समोर पाठपुरावा करण्यास परवानगी दिली आहे तसेच न्यायालयाने 'ट्री ऑथोरिटी'ला याबाबत निर्णय घेण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य दिले आहे.

# पुष्पक नोडमधील निविदा तातडीने रद्द करा; अन्यथा आंदोलन करणार!

## आमदार महेश बालदी यांचा सिडकोला इशारा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडकोने पुष्पक नोड येथील सेक्टर २८ (भाग-१)मधील जमिनीचा विकास करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केलेली आहे आणि त्या अनुषंगाने शेलघर येथील कातकरीवाडी विस्थापित होणार असल्याचे स्वरूप लक्षात येत आहे. त्यामुळे ही निविदा तातडीने रद्द करावी; अन्यथा आंदोलन उभारण्याचा इशारा उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी सिडकोला दिला आहे.



या संदर्भात आमदार महेश बालदी यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत हद्दीमधील शेलघर गावाच्या मागे असलेल्या आदिवासी बांधवांच्या घरांभोवतालच्या (कातकरीवाडी) जागेचा विकास करण्यासाठी सिडकोने निविदा काढल्याचे समजते. या निविदेमध्ये शेलघर येथील कातकरीवाडीसुद्धा विस्थापित होणार असल्याचे या स्वरूपावरून लक्षात येते. कातकरीवाडीतील घरे ही पारंपरिक रहिवाशांची असून गेल्या अनेक ते अनेक पिढ्यांपासून तेथे रहात आहेत आणि तसे पुरावे या आदिवासी बांधवांकडे उपलब्ध आहेत. विकासाच्या नावाखाली या लोकांना विश्वासात न घेता अथवा त्यांचे प्रतिनिधी व लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता त्या आदिवासी कुटुंबांना विस्थापित करण्यासाठी सिडको थेट निविदा काढते हे धक्कादायक आहे. त्यामुळे या संदर्भात सिडकोने तातडीने पुनर्विचार करावा आणि हे काम रद्द करावे तसेच या आदिवासी बांधवांना विस्थापित न होऊ देता स्थानिक प्रतिनिधींशी चर्चा करून मगच या गावांच्या परिसराच्या विकासाचे धोरण निश्चित करावे, असे या निवेदनात नमूद केले आहे. निविदा रद्द न झाल्यास आंदोलनात्मक पवित्रा उचलावा लागेल, असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे.

# तरुणीवर हल्ला करणाऱ्या नराधमाला कठोर शिक्षा करावी

## महाड भाजप महिला मोर्चाची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील अल्पवयीन कॉलेज तरुणीवर प्राणघातक हल्ला करणाऱ्या नराधम तरुणाला कठोर शासन व्हावे, अशी मागणी महाड भाजप महिला मोर्चाच्या वतीने पोलिसांकडे करण्यात आली आहे. या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंगळवारी (दि. २९) पीडित तरुणीच्या आई-वडिलांची भेट घेऊन त्यांना धीरही दिला.

महाडला हादरवून सोडणाऱ्या घटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील अकरावीमध्ये शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर एकतर्फी प्रेमातून सारळ शिंदे (वय २०) या तरुणाने काचेच्या बाटलीने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात तरुणी बालंबाल बचावली असून तिच्यावर महाड ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, चिटणीस डॉ. मंजुषा कुद्रीमोती, उपाध्यक्ष नीलिमा भोसले, दिप्ती नकाशे, शहराध्यक्ष नमिता दोशी, प्राजक्ता दळवी, सुजाता माने, अश्विनी मोरे, जिगेशा बुटाला, रूपाली पवार यांनी मंगळवारी महाड ग्रामीण रुग्णालयात जाऊन पीडित तरुणीची भेट घेतली आणि तिच्या आई-वडिलांना भेटून धीर दिला. त्याचप्रमाणे महाड शहर पोलीस ठाण्यात अधिकाऱ्यांची भेट घेऊन आरोपीस कठोर शासन करण्याची मागणी केली.

### शिवसेना पक्ष, चिन्हासंदर्भात १२ डिसेंबरला सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्षात मोठी फुट पडली. यानंतर शिवसेना पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण या निवडणूक चिन्हावर शिंदे गटाने दावा केलेला आहे. या संदर्भात येत्या १२ डिसेंबर रोजी निवडणूक आयोगापुढे पहिली सुनावणी होणार आहे.

निवडणूक आयोगाने दोन्ही गटांना पक्ष व पक्षचिन्हावर दावा सांगण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे जमा करण्यास मुदतवाढ दिली आहे. ९ डिसेंबरपर्यंत निवडणूक आयोगाकडे ही कागदपत्रे जमा करता येतील.



**पनवेल : तालुक्यातील केळवणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार सुशिल ठाकूर यांनी मंगळवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर त्यांनी माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, योगेश घरत, जे. डी. थळी, विलास ठाकूर, सागर ठाकूर, तेजस माळी, राजेश घरत यांच्यासमवेत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.**

## निवडक

### पोलीस भरतीचा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

**मुंबई :** पोलीस भरतीचा अर्ज भरण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. या निर्णयाबाबत प्रसारमाध्यमांना माहिती देताना उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, काही ठिकाणी तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे अर्ज भरण्याची तारीख आम्ही १५ दिवसांनी वाढवित आहोत.

### आजचा अंक चार पानी

**काही तांत्रिक अडचणींमुळे 'राम प्रहर'चा आजचा अंक चार पानी काढण्यात आला आहे. त्याबद्दल दिलगीर आहोत.**

# राज्यात मध्यावधी निवडणुकांचे दिवास्वप्न विरोधकांनी पाहू नये

## भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी सुनावले

**खोपोली : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे राज्यात मध्यावधी निवडणुका लागणार असे वारंवार प्रसारमाध्यमांना येऊन सांगतात. ते सर्वज्ञानी आहेत. काहीही बोलतात, मात्र विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी कुठल्याही परिस्थितीत मध्यवर्ती निवडणूक लागणार नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे राऊत यांनी एकदा त्यांना भेटून शंकेचे निरसन करून घ्यावे. राज्यात कुठल्याही परिस्थितीत मध्यावधी निवडणुका लागणार नाही. त्यामुळे हे दिवास्वप्न विरोधकांनी पाहू नये, असे भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.



त्या खोपोलीत महिला मेळाव्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, पनवेलच्या माजी महापौर कविता चौतमोल, खोपोलीचे प्रभारी सुनील घरत, कोकण संघटक अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, शहर अध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस मृणाल खेडकर यांच्यासह स्थानिक सर्व सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शासकीय यंत्रणांवरील कारवाईसंदर्भातील प्रश्नाला उत्तर देताना चित्रा वाघ म्हणाल्या की, सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडी, सीबीआय या स्वायत्त संस्था आहेत. त्यांच्याकडे कागदपत्रे असल्याशिवाय त्या कारवाई करीत नाही. मग खासदार संजय राऊत यांनी ५५ लाख बँकेत का भरले? ते काय वेडे होते का? पुढे बोलताना त्यांनी न्यायालयाचा निकाल त्यांच्या बाजूने लागला तर न्यायव्यवस्थेवर आमचा विश्वास आहे असे बोलतात, मात्र भाजपच्या बाजूने निकाल लागल्यावर या सर्व संस्था दावणीला बांधल्याचा आरोप केला जातो याकडे त्यांनी लक्ष वेधले.

भारतीय जनता पक्षात कुठलीही लॉबिंग चालत नाही. मला या पक्षात येऊन कधी तीन वर्षे झाली हे कळलेदेखील नाही. आमदार प्रशांतदादा ठाकूर यांना बघा, अश्विनीताई पाटील यांना बघा. ज्यांच्याकडे कामाची ऊर्जा आहे त्यांना निश्चित संधी मिळते. त्यामुळे विरोधकांनी भाजपमध्ये अंतर्गत ढवळाढवळ करू नये. आधी तुमचे गड सांभाळा, करण केव्हा तुमचा गड कोसळेल हे तुम्हालाही माहीत पडणार नाही. तेव्हा आमच्या नादी लागू नका, असा इशारा त्यांनी दिला. **(पान २ वर..)**



# मोहा कोळीवाड्यात रस्ता डांबरीकरण

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून विकासाची अनेक कामे करण्यात येत आहे. त्या अंतर्गत तरघर ग्रामपंचायत हद्दीतील मोहा कोळीवाडा येथे आमदार महेश बालदी यांच्या निधीतून होणाऱ्या रस्ता डांबरीकरण कामाचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २९) करण्यात आले आहे.



मोहा कोळीवाडा येथील रेल्वेपुलापासून ते अंबुजा प्रवेशद्वारापर्यंत रस्ता डांबरीकरण करण्यात येत आहे. या रस्त्याच्या कामासाठी १५ लाख रुपये निधी मंजूर झाला आला. या कामाच्या भूमिपूजन समारंभाला सरपंच सविता कोळी, कोळी समाज जिल्हाध्यक्ष विश्वनाथ कोळी, महादेव कोळी, चंद्रकांत कोळी, जगदिश कोळी, लक्ष्मण कोळी, मच्छिंद्र कोळी, हेमंत कोळी, जयेंद्र कोळी, ग्रामसेविका पवित्रा हाटले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.




## संपादकीय

# भळभळत्या जखमेवर मीठ

**गोव्यातील इफ्फी या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'द काश्मीर फाइल्स' दाखवण्यात आला. या महोत्सवातील ज्युरींचे प्रमुख म्हणून नदाव लापिड महाशय निमंत्रित होते. महोत्सवानंतर 'द काश्मीर फाइल्स' हा चित्रपट बीभत्स आणि तद्दन प्रचारकी असल्याची जळजळीत टीका त्यांनी केली. 'द काश्मीर फाइल्स' त्यांना बीभत्स आणि प्रचारकी ढंगाचा का वाटला हे कोडेच आहे. एक तर त्यांना हृदय नसले पाहिजे किंवा त्यांनी आपली अक्कल कुठल्या तरी टूलकिटवाल्याकडे गहाण ठेवली असावी.**

ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात काश्मीर खोऱ्यातील बर्फ धुमसत होते, तेव्हा केंद्रातील काँग्रेसप्रणित सरकार आत्मानंदात मश्गूल होते. लांगुलचालनाचे राजकारण चरमसीमेला पोहचले होते तो हा काळ. हिंदुत्व हा एक अपशब्द ठरू पाहात होता. त्याला कारणीभूत काँग्रेसचे सर्वधर्मसमभावाच्या नावाखाली सुरू असलेले उद्योग होते. ऐंशी-नव्वदच्या दशकात काश्मीर खोऱ्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांनी थैमान घातले होते. जिहादचा नारा दुमदुमत होता. पाकव्याप्त काश्मीरमधून राजरोस अतिरेकी येत जात होते. काश्मिरी तरुणांना चिथावणी देत होते. याच काळात काश्मिरी पंडितांचे अत्यंत क्रूर शिरकाण झाले. कित्येक लाख काश्मिरी पंडितांनी एका रात्रीत आपले घरदार सोडून देशामध्ये सुरक्षित आसरा गाठला. अल्पावधीतच काश्मीर खोऱ्यात औषधापुरताही पंडित उरला नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे काश्मिरी पंडितांची ही ससेहोलपट केंद्रातील काँग्रेसप्रणित सरकारला दिसत नव्हती. किंबहुना, सत्ताधाऱ्यांना त्याकडे बघायचेच नव्हते. परिणामी काश्मिरी पंडितांनी आपले दु:ख उराशी ठेवून मूकपणे जीवन कंठण्यास सुरूवात केली. काश्मीरमधील सारा ताजा इतिहास 'द काश्मीर फाइल्स' या चित्रपटात अतिशय प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. हा चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा भारतीय प्रेक्षकांनी त्याला उदंड प्रतिसाद दिला. 'द काश्मीर फाइल्स' हा चित्रपट मनाला भिडण्यासाठी रसिकत्वाची पूर्वअट नव्हती. चित्रपट कलेतील ज्ञान असण्याची आवश्यकता नव्हती. केवळ भारतीय असणे पुरेसे होते. नेमकी हीच गोष्ट विख्यात इस्रायली निर्माते-दिग्दर्शक नदाव लापिड विसरले. हे लापिड महाशय इस्रायली असूनही त्यांना काश्मिरी पंडितांचे दु:ख कळले नाही याला काय म्हणावे? काही चित्रपट कलात्मकतेसाठी निर्माण झालेलेच नसतात. त्यामुळे त्यांना कलेचे निकष लावणे अनाठायी ठरते. 'द काश्मीर फाइल्स' चित्रपटाला प्रचारकी म्हणायचे तर दुसऱ्या महायुद्धात हुकुमशहा हिटलरने केलेल्या लाखो यहुद्यांच्या शिरकाणाबद्दल काही सांगू पाहणारे सगळेच चित्रपट निकालात काढावे लागतील. त्यादृष्टीने 'होलोकॉस्ट'वर निघालेला प्रत्येक चित्रपट बीभत्स आणि प्रचारकी ठरवावा लागेल. सुदैवाने ऑस्कर पुरस्कारांच्या ज्युरीमध्ये या लापिड महाशयांसारखे महामूर्ख ज्युरी नसतात. म्हणूनच तेथे 'शिंडलर्स लिस्ट'सारख्या चित्रपटाला सन्मानाने गौरविले जाते. 'द काश्मीर फाइल्स' हा चित्रपट केवळ एक दोन-अडीच तासांचा मनोरंजनपट नाही. काश्मिरी पंडितांची शोकांतिका पडद्यावर आणणाऱ्या निर्माता-दिग्दर्शक आणि कलावंतांचे कौतुक होण्याऐवजी कुण्या तिय्यम दर्जाच्या उपऱ्या ज्युरीकडून निंदानालस्ती पदरी पडली ही अत्यंत दु:खाची बाब आहे. भारतात सक्रिय असलेल्या टूलकिट गँगचा हा नवा आविष्कार तर नाही ना अशी शंका येते. काश्मिरी पंडितांच्या भळभळत्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम इफ्फीच्या ज्युरींनी केले. त्यांचा निषेध करावा तितका थोडाच. असले प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी यापुढे परदेशातील तथाकथित विद्वान निमंत्रित करताना काळजी घ्यायला हवी.

# पनवेल मनपातर्फे गोवर रूबेलाबाबत जनजागृती

**पनवेल : प्रतिनिधी**

कोरानाचे संकट लसीकरणामुळेच टळले, गोवर रूबेलाचेही संकट लसीकरणामुळे टळणार आहे. हा रोग तसा आपल्यासाठी नवीन नाही. पण सध्या आऊट ब्रेक झाला असल्याकारणाने आपल्याला जागृक रहावे लागणार आहे. याचा मुकाबला करण्यासाठी लसीकरण हा सर्वोत्तम उपाय असल्याचे गोवर रूबेलाच्या रूग्णसंख्येत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्त गणेश देशमुख यांनी याकुब बेग माध्यमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना सांगितले.




या वेळी सहाय्यक आयुक्त वैभव विधाते, महापालिका प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, याकुब बेग माध्यमिक शाळेचे ट्रस्टी माजी नगरसेवक इक्बाल काझी, मुकीत काझी, नूर पटेल, अलिम पटेल, हानिफ मुल्ला, उस्मान पटेल, नाविद पटेल तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी आयुक्तांनी विद्यार्थ्यांना गोवर रूबेलाच्या लसीकरणाचे फायदे सांगून घरी गेल्यानंतर आपल्या पालकांना या लसीकरणाचे महत्व पटवून देण्यास सांगितले.

आयुक्तांनी साधलेल्या यासंवादाला विद्यार्थ्यांचाही मोठा प्रतिसाद लाभला विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने पुढे येऊन लसीकरणाबाबत पालकांना माहिती सांगणार असल्याचे सांगितले.

सहाय्यक आयुक्त डॉ. वैभ्व विधाते आणि प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांनीही विद्यार्थ्यांना गोवर लसीकरण केले नाही तर पुढे जाऊन होणारे दुष्परिणाम आणि लसीकरणामुळे होणारे फायदे याची माहिती दिली.

गोवरवरती लसीकरण हा प्रभावी उपचार असून त्यादृष्टीने सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच बाह्य लसीकरण केंद्रे यांच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रात लसीकरणाचा वेग वाढविण्यात आला आहे., लसीकरण बाकी राहिलेल्या बालकांसाठी अभियान स्वरूपात विशेष लसीकरण सत्रे राबविण्यात येत आहे. पालिका क्षेत्रातील बालरोगतज्ज्ञ आणि स्त्रीरोग तज्ज्ञ यांची बैठक बोलविण्यात आली होती गोवरची लक्षणे दिसत असलेल्या रूग्णांनी आपल्या नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य् केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

आयुक्त गणेश देशमुख यांनी सध्यस्थितीत मुंबई परिसरात वाढत असलेल्या गोवर रुग्णाबदल माहिती देवून पनवेल महानगरपालिका क्षेत्रात त्यात वाढ होऊ नये त्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्या लागतील तसेच लसीकरण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी आयुक्तांच्या कामाची प्रशंसा केली तसेच त्यांच्या या कार्यात सहकार्य करण्यास तयार असल्याचे सांगितले. याव्यतिरिक्त संस्थेचे सदस्य माजी नगरसेवक मुकीत काझी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉक्टर रेहाना मुजावर त्यांचे सहकारी, संस्थेचे सचिव नूर हसनमिया पटेल, सदस्य नवीद अब्दुल कादिर पटेल.उसामा गुलाम हुसैन पटेल, मोहम्मद हनीफ बाबरशरफुद्दीन मुल्ला, इतर मान्यवर, पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य आसीम पटेल यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव अलीम पटेल यांनी केले.


# पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटीलांची बैठक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंथन हॉल या ठिकाणी घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये सर्व पोलीस पाटील यांना गावातील प्रत्येक राजकीय, जातीय, धार्मिक कार्यक्रम व चालू घडामोडी बाबत माहिती कळवणे, गावात तटस्थ भूमिका ठेवणे, अवैद्य धंदेबद्दल तात्काळ माहिती देणे, गावाच्या माहितीबाबत रजिस्टर बनवणे, गोडाऊनमध्ये असलेले संशयास्पद माल, अचानक वास्तव्यास आलेल्या संशयित व्यक्तीवर व परकीय नागरिकांवर लक्ष ठेवणे, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे भंग होणार नाही याबाबत लक्ष देणे आदी सूचना देण्यात आल्या. सदर बैठकीला ४० पोलीस पाटील उपस्थित होते.





**नवी मुंबई : रामचंद्र बाळाराम ठाकूर यांचे सुपुत्र ललित ठाकूर आणि उमेश जयराम पाटील यांची कन्या निशिता पाटील यांचा शुभविवाह सोमवारी नेरूळ येथे झाला. या वेळी नवदाम्पत्याला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : अलका कमलाकर आंबो म्हात्रे यांची कन्या कृतिका आणि रंजना लहू लक्ष्मण पाटील यांचा शुभविवाह सोमवारी उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे झाला. या वेळी या नवदाम्पत्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि अर्चना ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : रोहिणी रमण ठाकूर यांची कन्या प्रियंका आणि रजनी कमलाकर म्हात्रे यांचे ज्येष्ठ पुत्र दर्शन यांचा शुभविवाह सोमवारी पनवेल येथे झाला. या नवदाम्पत्याला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# जेएनपीएमध्ये अधिकाऱ्यांसाठी ओरिएंटेशन प्रोग्राम

## विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व अग्रगण्य प्राध्यापक करणार मार्गदर्शन

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण अर्थात जेएनपीए हे भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर असून जेएनपीए ने आपल्या प्रशिक्षण केंद्रात देशातील 'प्रमुख बंदरांतील अधिकाऱ्यांसाठी ओरिएंटेशन कार्यक्रम' आयोजित केला आहे. हा कार्यक्रम २८ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२२ पर्यंत चालेल. डीजी शिपिंगच्या माजी संचालक व भारतीय सागरी विद्यापीठाच्या कुलपति डॉ. मालिनी शंकर यांनी या ओरिएंटेशन प्रोग्रामचे उद्घाटन केले.

या वेळी जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, एमपीएसईजेडचे माजी संचालक व जेएनपीएचे सल्लागार राजीव सिन्हा, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ प्राध्यापक सदस्य आणि भारतातील प्रमुख बंदरांमधील सहभागी अधिकारी उपस्थित होते.

जेएनपीएद्वारे देशातील प्रमुख बंदरांतील अधिकाऱ्यांसाठी आयोजित केलेला हा अशा प्रकारचा पहिलाच ओरिएंटेशन प्रोग्राम आहे. यासाठी बंदरे, जहाजवाहतूक आणि जलमार्ग मंत्रालयाने सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांना बंदर अधिकाऱ्यांसोबत आपले ज्ञान व कौशल्य सामायिक करण्यासाठी आमंत्रित केले आहे. आपल्या देशातील बंदर क्षेत्रातील कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि त्यामध्ये प्रासंगिक व नवीन कार्यपद्धती आणण्यासाठी भारतातील सर्व प्रमुख बंदरांमधून अधिकारी या ओरिएंटेशन प्रोग्राममध्ये सहभागी झाले आहेत.

यावेळी बोलताना डीजी शिपिंगच्या माजी संचालक व भारतीय सागरी विद्यापीठाच्या कुलपति डॉ. मालिनी शंकर म्हणाल्या, जेएनपीएने हा एक अतिशय स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे, कारण या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापकांच्या सोबत होणारी चर्चा व मार्गदर्शना द्वारे बंदर अधिकार्यांना एक वेगळा दृष्टीकोन प्राप्त होईल ज्यामुळे बंदर अधिकार्यांचे कौशल्य वाढवण्यास आणि त्यांना प्रासंगिक व नवीन कौशल्य प्राप्त करण्यास मदत होईल. महसूल मॉडेल, मालकी मॉडेल, बंदर क्षेत्रातील पीपीपी, लॉजिस्टिक आणि पुरवठा साखळी इत्यादी विविध विषयांवर होणारी चर्चा व मार्गदर्शनातून सागरी उद्योगाच्या मागण्या आणि अपेक्षा पूर्ण होण्यास मदत होईल.

दोन आठवडे चालणाऱ्या या ओरिएंटेशन कार्यक्रमा दरम्यान सहभागींना वित्त, ऑपरेशन्स, डिजिटायझेशन, ड्रेजिंग, बंदरातील खाजगी क्षेत्राचा सहभाग, रणनीती आणि त्याच्या व्यवसाय युनिट संदर्भात मार्गदर्शना सोबतच बंदराच्या समग्र कामकाजाचे विहंगावलोकन केले जाईल. पीपीपी प्रकल्पांची ओळख, सवलतीच्या कराराची संकल्पना, चांगल्या प्रकल्प कराराची वैशिष्ट्ये आणि नियामक मंजुरींसह देखरेख जसे की पर्यावरण मंजुरी आणि प्रक्रिया, मॉडेल पोर्ट डेव्हलपमेंटचे सर्वसमावेशक मूल्यांकन, इत्यादीसह इतर विविध विषयांवर प्राध्यापकांद्वारा मार्गदर्शन केले जाईल.

**सध्याच्या वेगवान कामाच्या वातावरणात समग्र ज्ञान व कौशल्य प्राप्त करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन हा प्रशिक्षण कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. दोन आठवडे चालणा-या या प्रशिक्षण कार्यक्रमा मध्ये देशातील विविध क्षेत्रातील अग्रगण्य तज्ज्ञ व अनुभवी प्राध्यापक विविध विषयावर मार्गदर्शन व बंदराच्या कामकाजाचे समग्र विहंगावलोकन करतील.**
**-संजय सेठी, अध्यक्ष, जेएनपीए**




## पान १ वरून

### राज्यात मध्यावधी निवडणुकांचे दिवास्वप्न विरोधकांनी पाहू नये

रायगड जिल्ह्याला पालकमंत्री नेमण्याच्या विषयाच्या प्रश्नाबाबत त्यांनी हा सरकारचा निर्णय आहे. जी निवड समिती आहे ती हा निर्णय घेत असते. पक्षाने दिलेली जबाबदारी असते ती पूर्ण करायची आमचे काम असते. आता लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. कोणालाही संधी मिळू शकते. कदाचित माझ्या बाजूला बसलेल्या प्रशांतदादांनाही संधी मिळेल, असे चित्रा वाघ यांनी सांगताच उपस्थित पत्रकारांनी स्वागत केले.

यानंतर पत्रकारांनी भाजप जिल्हाध्यक्ष प्रशांत ठाकूर यांना खोपोली नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीबाबत प्रश्न विचारला असता त्यांनी सांगितले की, आगामी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका भाजप सर्व ताकदीनिशी निवडणूक लढवणार आहे. जिल्ह्यात भाजप आणि बाळासाहेबांच्या शिवसेनेचे मिळून सहा आमदार आहेत. ज्याची ज्या ठिकाणी जास्त ताकद आहे त्या ठिकाणची पोषक भूमिका घेत निवडणूक लढवणार आहोत. पक्षाच्या माध्यमातून मतदारापर्यंत वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून पोहचून या शहराला एक सक्षम नेतृत्व देण्यासाठी भाजप तयारी करीत आहे.

**लव्ह जिहादविरोधात कायद्यासाठी आग्रही**

वसईतील श्रद्धा वालकर या तरुणीविषयी बोलताना चित्राताई भावूक झाल्या. कुटुंबाला ठोकरून ती लिव्ह-इन प्रियकर आफताबकडे गेली आणि त्यानंतर जे घडले ते फारच भयानक आहे. सध्या आई-वडिलांचा कमी झालेला संवाद, त्यांच्याकडे मुलांना देण्यासाठी वेळ नसणे अशी भयानक परिस्थिती समाजात आहे. श्रद्धाचा निर्णय चुकीचा होता, पण असे प्रकार पुन्हा होऊ नये यासाठी उत्तर प्रदेशच्या धर्तीवर धर्मांतरविरोधी कायदा राज्यात यायला पाहिजे या दृष्टीने आम्ही महिला मोर्चातर्फे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आहोत. लव्ह जिहादविरोधात कायद्यासाठी आग्रही राहणार आहोत, असे त्यांनी सांगितले.

# गव्हाण विद्यालयात क्रीडा महोत्सव

## चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी क्रीडा ज्योत प्रज्ज्वलित केली.





उद्घाटन समारंभास गव्हाण ग्रामपंचायतचे उपसरपंच विजय घरत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, गुरूकुल प्रमुख संदीप भोईर, परीक्षा प्रमुख चित्रलेखा पाटील अन्य शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड विभागाच्या वतीने कृतज्ञता सप्ताह अंतर्गत विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असल्याने क्रीडा स्पर्धेस विद्यालयाच्या मैदानावर स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी बोलताना अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांमध्ये सांघिक खेळाची भावना वृद्धिंगत व्हावी आणि या विद्यालयातून अधिकाधिक उत्तम व दर्जेदार खेळाडू तयार व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यानंतर विद्यार्थ्यांना क्रीडा शपथ देण्यात आली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन उपशिक्षक सागर रंधवे यांनी केले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# माणगावात एक्स्प्रेस रेल्वेला हवा स्टॉप!

## थांबाच नसल्याने प्रवाशांची कुचंबणा

**माणगाव : प्रतिनिधी**

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरोडोरमुळे माणगाव शहर जगाच्या नकाशावर पोहोचले आहे. त्यामुळे व्यापारी, उद्योजक, पर्यटक, विद्यार्थी रेल्वेने जास्त प्रवास करतात. मात्र माणगाव रेल्वे स्थानकात लांबपल्ल्याच्या व महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्यांना थांबा नसल्यामुळे हजारो पर्यटक व प्रवाशांची कुचंबणा होत आहे. या रेल्वे स्थानकावर सर्व एक्सप्रेस रेल्वे गाड्यांना 'स्टॉप' मिळावा, यासाठी विविध संस्था, संघटना, राज्यकर्ते यांनी अनेक वेळा केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना निवेदने दिली आहेत.



(छाया : सलीम शेख)

छत्रपती शिवरायांची रायगड ही राजधानी आहे. या राजधानीपासून माणगाव रेल्वे स्थानक हे २५ किमी. अंतरावर आहे. माणगाव हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे. तसेच ते तळकोकणाचे प्रवेशद्वार आहे. या तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांच्या जमिनी कोकण रेल्वेने संपादीत केल्या आहेत. त्यांच्या सहकार्यातूनच कोकण रेल्वे सुरु आहे. माणगाव रेल्वे स्थानकाला श्रीवर्धन, म्हसळा, तळा, महाड, पोलादपूर, सुधागड व माणगाव हे तालुके जोडले आहेत. या सात तालुक्याची लोकसंख्या सुमारे १० लाख असून त्यांना माणगाव हे एकमेव मध्यवर्ती रेल्वे स्थानक आहे. विद्युतीकरण व दुपदरीकरण झाल्यामुळे कोकण रेल्वे मार्गावरील माणगाव स्थानकाचे महत्व वाढले आहे.

माणगाव रेल्वे स्थानक ते मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) अशी लोकल सुरु करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होत आहे. तसेच कोकण रेल्वे मार्गामुळे दक्षिण व उत्तर भारतात प्रवास करणे शक्य झाले आहे. मात्र माणगाव रेल्वे स्थानकात राजधानी एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस, मंगला एक्सप्रेस, नेत्रावती एक्सप्रेस, कोकणकन्या एक्सप्रेस, मारूसागर एक्सप्रेस, कोचीवली-निजामुद्दिन एक्सप्रेस, मत्सगंधा एक्सप्रेस, गरीबरथ, एलटीटी दुरांतो एक्सप्रेस व नव्याने सुरु झालेली मडगाव-नागपूर एक्सप्रेस या लांबपल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना 'स्टॉप' नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत.

> **माणगाव रेल्वे स्थानकात मेल, एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्यात यावा, यासाठी रेल्वे प्रवासी संघटनेने यापूर्वी अनेक वेळा कोकण रेल्वे कॉर्पोरेशन प्रबंधक निदेशक यांना निवेदने दिली आहेत. मात्र या मागणीचा विचार रेल्वे प्रशासनाने केलेला नाही.**
> **-रमेश जैन, अध्यक्ष, माणगाव तालुका रेल्वे प्रवासी संघटना**

# आमडोशी येथील जल जीवन पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

**माणगाव : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन, हर घर जल या कार्यक्रमाअंतर्गत माणगाव तालुक्यातील आमडोशी गावाच्या २७ लाख रुपये खर्चाच्या वाढीव नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन मंगळवारी (दि.२९) पेण तर्फे तळे ग्रामपंचायतीच्या सरपंच रसिका राजेंद्र कळंबे यांच्या हस्ते करण्यात आले.

आमडोशी गाव अध्यक्ष गणेश घुळघुले, पेण तर्फे तळे ग्रामपंचायत सदस्य एकनाथ शिगवण, सदस्या निशा सकपाळ, पाणी कमिटी सचिव बाबुराव नासकर, सुनील शिगवण, ग्रामसेवक अभिषेक मकु तसेच अंकुश घुळघुले, सीताराम घुळघुले, नामदेव घुळघुले, मनोज सोनकर, अरुण गायकवाड, काशीराम कासारे यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

> **जलजीवन मिशन अंतर्गत बोरघर येथील नळ पाणीपुरवठा योजनेला ६० लाख रुपये आणि पेण तर्फे तळे येथील पाणी योजनेसाठी एक कोटी दोन लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून, या योजनांची कामे लवकरच सुरू होतील.**
> **-रसिका राजेंद्र कळंबे, सरपंच, पेण तर्फे तळे ग्रामपंचायत, ता. माणगाव**





# कोळघर आदिवासी आश्रमशाळेत व्यसनमुक्ती स्पर्धा

**अलिबाग : जिमाका**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय व नेहरू युवा केंद्र-अलिबाग यांच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थांचे दुष्परिणाम याविषयावर तालुक्यातील कोळघर येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत नुकताच व्यसनमुक्ती स्पर्धा व मौखिक आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.



रायगड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने आणि अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद गवई यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या शिबिरात आश्रमशाळेचे मुख्याध्यापक श्री. पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शिबिरात तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी समाजसेवक सुशील साईकर यांनी माहिती दिली व विद्यार्थ्यांनी माझे कुटुंब तंबाखूमुक्त ठेवेन व माझे गाव तंबाखूमुक्त ठेवण्यासाठी प्रयत्न करेन प्रतिज्ञा घेतली पाहिजे, असे सांगितले. समाजसेवक प्रणित म्हात्रे यांनी अत्यंत सोप्या शब्दात मुलांना संविधान दिनाचे महत्त्व सांगितले.

या वेळी व्यसनमुक्ती विषयावर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील विजेत्यांना तंबाखू नियंत्रण कक्षाचे जिल्हा कार्यक्रम सल्लागार डॉ. विकास पवार, दंत चिकित्सक डॉ. नाविना ठाकूर, आदिवासी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक पाटील आणि नेहरू युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी निशांत रौतेला यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आली. यानंतर डॉ. नाविना ठाकूर यांनी शाळेतील ३४० मुलामुलींची मौखिक आरोग्य तपासणी केली.

# पीकअपची दोन दुचाकींना धडक

## एक ठार, एक जबर जखमी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा-कोलाड मार्गावरील किल्ला गावानजीक चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने सोमवारी (दि. २८) रात्री पिकअपने दोन दुचाकींना धडक दिली. या अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला तर दूसरा दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.

ज्ञानेश्वर भावे (रा. निळज) हे आपली दुचाकी (एमएच-०४,एलडी-८४३१) चालवीत कोलाड येथून सोमवारी रात्री धाटाव येथे येत होते. शेतकरी शाळेनजीक समोरून भरधाव वेगात आलेल्या पिकअप (एमएच-०६,बीजी- ३१००) ने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात ज्ञानेश्वर भावे यांचा जागीच मृत्यू झाला. नियंत्रण सुटलेल्या या पिकअपने पुढे जाऊन किल्ला गावाजवळ दुसऱ्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार गौरव सुर्वे जबर जखमी झाला. त्याला पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर त्याचा सहप्रवासी यश दाभोलकर हा किरकोळ जखमी झाला आहे. अपघातानंतर पिकअप चालक धरमनाथ हरंगी (सध्या रा. किल्ला-रोहा, मूळ रा. बिहार) फरार झाला आहे.

या अपघाताची नोंद रोहा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पिकअप चालक धरमनाथ हरंगी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस कॉन्स्टेबल शिरसाट करीत आहेत.

# माणगाव येथील सायराबानू चौगुले यांना उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार प्रदान

**माणगाव :** तालुक्यातील प्रसिद्ध कवयित्री सायराबानू वजीर चौगुले यांच्या चांदणं शब्दांचं या काव्यसंग्रहाला मुस्लिम मराठी साहित्य सांस्कृतिक मंडळाने राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी पुरस्कार जाहीर केला होता. रविवारी (दि. २७) औरंगाबाद येथे झालेल्या कार्यक्रमात प्रसिद्ध गझलकार ए. के. शेख व मंडळाचे अध्यक्ष डॉ. इकबाल मिन्ने यांच्या हस्ते सायराबानू चौगुले यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. चांदणं शब्दांचं या काव्यसंग्रहाला राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल सायराबानू चौगुले यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# एकदरा खाडीत गॅबियन बंधारा उभारावा

## मुरूड कोळी समाजाची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**


मुरूड समुद्र किनारा व लगत असणारी एकदरा खाडीच्या मुखाशी गॅबियन बंधारा मंजूर करून तो लवकरात लवकर उभारण्यात यावा, अशी मागणी मुरुड कोळी समाजाने केली आहे.

समुद्राला ओहोटी लागल्यावर बोटी किनाऱ्याला लागणे कठीण होऊन बसते. मोठ्या होड्या किनाऱ्यावर येण्यासाठी कोळी बांधवांना भरतीची वाट पहावी लागते. खोल समुद्रातच बोटी थांबवाव्या लागत असल्याने पकडलेली मासळी शिळी होऊन मच्छिमारांचे प्रचंड नुकसान होत आहे.

मुरूड हे पर्यटन स्थळ असून समुद्र किनारी शनिवारी, रविवारी शेकडो पर्यटक ये-जा करीत असतात पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही येथे ग्रोयेन्स बंधारा होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे पर्यटकांना याठिकाणी सुरक्षिपणे पोहण्याचा आनंद घेता येईल.

गॅबीयन बंधारा झाला तर मच्छिमारांना मोठा दिलासा मिळणार आहे. या बंधाऱ्यामुळे पर्यटक व मच्छिमारांचे कायम स्वरूपी भले होणार आहे. त्यामुळे मुरूड समुद्र किनारा व लगत असणारी एकदरा खाडीच्या मुखाशी गॅबीयन बंधारा लवकरच लवकर मंजूर करून स्थानिक मच्छिमार बांधवाना शासनाने दिलासा द्यावा, अशी मागणी मुरूड कोळी समाजाकडून होत आहे.

> **बंधारा नसल्यामुळे स्थानिक मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. एकदरा खाडीच्या मुखाशी गॅबीयन बंधारा उभारण्यात यावा, यासाठी आम्ही गेली नऊ वर्ष पाठपुरावा करीत आहोत. आता पुन्हा एकदा आमच्या सोसायटीचे शिष्टमंडळ संबंधित मंत्री महोदयांना भेटून गॅबीयन बंधाऱ्याची मागणी करणार आहे.**
> **-मनोहर बैले, चेअरमन, सागर मच्छीमार सोसायटी, मुरूड**



# रायगडात यंदा २५ हजार हेक्टरवर रब्बीची लागवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात यंदा २४ हजार ९९४ हेक्टरवर रब्बी पिकांची लागवड केली जाणार आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आठ हजार हेक्टरवर अधिक लागवड करण्याचे उद्दीष्ट कृषी विभागाने ठेवले आहे. त्यासाठी एक हजार क्विंटल बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे.



भात कापणी पुर्ण झाल्याने शेतकऱ्यांनी रब्बी हंगामाची बेगमी सुरु केली आहे. रायगड जिल्ह्यातील रब्बी लागवडीखालील सरासरी क्षेत्र २१ हजार ५७५ हेक्टर आहे. यापैकी १७ हजार ६७३ हेक्टरवर गेल्या वर्षी रब्बी हंगामातील लागवड झाली होती. यावर्षी चांगला पाऊस झाल्याने हे लागवड क्षेत्र वाढेल अशी अपेक्षा आहे. यंदा २४ हजार ९९४ हेक्टरवर रब्बी लागवड केली जाईल, अशी अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे. यात प्रामुख्याने क़डधान्ये आणि भाजीपाला पिकांचा समावेश आहे.

प्रामुख्याने वाल, पावटा, चवळी, हरभरा, उडीद, तूर, मुग, वाटाणा, मटकी व इतर क़डधान्यांची १६ हजार हेक्टरवर लागवड केली जाणार आहे. तर भूईमुग, सुर्यफुल, सोयाबिन, उन्हाळी भात, उन्हाळी नाचणी आणि भाजीपाला यांचीही सुमारे नऊ हजार हेक्टरवर लागवड केली जाणार आहे. यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान उपक्रमाअंतर्गत ४०२ क्विंटल बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे. तर आत्मा योजने आंतर्गत ६३३ क्विंटल बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सिंचनाची संसाधने फारशी उपलब्ध नसल्याने, शेतीला पाण्याची उपलब्धता व्हावी यासाठी लोकसहभागातून वनराई बंधारे उभारण्याचे नियोजन कृषी विभागाने केले आहे. त्याकरिता खाजगी कंपन्याच्या मदतीने रिकाम्या पॅकींग बॅग्ज उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. श्रमदानातून या बंधाऱ्यांची उभारणी होणार आहे. रायगड जिल्ह्यात यंदा सोयाबिन आणि सुर्यफूल या दोन पिकांची प्रायोगिक तत्वावर लागवड केली जाणार आहे.


## नर्सिंग कोर्स प्रवेश

जी. एन. एम./ए. एन. एम.
सन २०२२ -२३ वर्षाकरीता प्रवेश उपलब्ध
**शैक्षणिक पात्रता :** बारावी उत्तीर्ण (आर्टस्/कॉमर्स/सायन्स)
प्रवेशाची अंतीम तारीख ३०/११/२०२२
**पत्ता :** लाईफ लाईन स्कूल ऑफ नर्सिंग एस.टी. स्टँडसमोर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, लाईन आळी, पनवेल.
**संपर्क :** ९३७२७१६१६०/९९४७७२०७७७/ ८८८८२३१८८८/९३२१२७७२०३

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ Tender No.-43/2022-23 Dt. 02.11.2022 **RFx No. 7000025100** | Sub: **Second Call** for SRM E-Tender for Supply of Ladder & Mats at various Substation & KTL S/Dn. Mahad under EHV (O&M) Division, Mahad. | Up to Rs. 4,94,444/- (Including GST) |

**EMD** will be 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is the highest & **Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission** is from **30.11.2022 @ 00:00 Hrs to 06.12.2022 @ 23:59 Hrs** for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/Tender-48/ 2022-23 Dt. 30.11.2022 **RFx No. 7000025292** | Sub: Invitation of SRM E-Tender for the work of Stub strengthening of towers of various 220 kV / 100 kV EHV line S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn., Mahad for the year 2022-23 | Upto Rs. 24,99,094/- (Including GST + 1% Labour Cess) |
| 2 | **Tender No:** EE/EHV (O&M)/DN/MHD/ E-Tender No. 49/ 2022-23 Dt. 30.11.2022 **RFx No. 7000025293** | Sub: Invitation of SRM E-Tender for the work of new pipe type earthing of towers of various 220 kV /100 kV EHV line under KTL S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2022-23 | Up to Rs. 4,95,025/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is the highest & **Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission** is from 30.11.2022 @ 00:00 Hrs to 06.12.2022 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089. **Note**: All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn., Mahad**

महावितरण

## निविदा सुचना

अलिबाग विभागाअंतर्गत अलिबाग-१ उपविभागातील ग्राहकांचे रिडिंग घेणेसाठी, वीज देयके छपाई व वाटप करण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे:

| निविदा क्रमांक | उपविभाग |
|---|---|
| बिलिंग/काअ/अलिबाग/टि-०३/११-२०२२ | अलिबाग-१ |

अंदाज पत्रकीय रक्कम :- प्रत्येकी १९५.१२ लाख
निविदा भरण्याची अंतिम दिनांक :- १४/१२/२०२२
अधिक माहितीसाठी पुढील संकेत स्थळावर संपर्क साधावा.
https://etender.mahadiscom.in/eatApp/

**कार्यकारी अभियंता,** अलिबाग विभाग

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे - बिड, तालुका पनवेल सर्व्हे क्र.४८/८, ३८/३/अ/४/ब, मौजे - पिसार्वे, ता. पनवेल सर्व्हे क्र.६१/२, २/१०९, २/४५, २/७१, मौजे - रोहिंजण, ता. पनवेल सर्व्हे क्र. १२० / २ आणि मौजे - धानसर, ता. पनवेल सर्व्हे क्र.८१ या शेतजमीन मिळकतीबाबत आमचे अशिलांनी जमीन मालक यांचेशी करार केलेला आहे, त्यामुळे सदरच्या मिळकतीबाबत इतर कोणीही खरेदी विक्रीचा किंवा कुठल्याही प्रकारचा व्यवहार करु नये, सदर मिळकतीवर त्रयस्थ इसम हक्क सांगुन घाई गडबडीने खरेदी विक्री करण्याची दाट शक्यता आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणीही, कोणत्याही इसमाबरोबर अथवा संस्थेबरोबर व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर असेल व सदरचा व्यवहार आमच्या अशिलांना बंधनकारक राहणार नाही व त्याकामी होणाऱ्या नुकसानीस, सदरचा व्यवहार करणारे जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक-२९/११/२०२२

**सही/-**
**ॲड. चेतन जाधव**

पुष्कर को.हौ.सो., फ्लॅट नं. ०२, प्रांत कार्यालयाजवळ, जुना ठाणा नाका रोड, ता. पनवेल, जि. रायगड. पिन-४१०२०६.
मोबाईल नं. ९८९२७३९११५

## नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)

**परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना**

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/Auto/2019/3858 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 BD 6823 चे मालक **श्री. जुबेर अहमद शेख** यांचे तारीख २५/०५/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती शौकतबी अहमद शेख, पत्ता- टिनवाला बिल्डींग, १ फ्लोर, रुम नं. ११, २६, याकुब पथ, जे. जे. हॉस्पिटलजवळ, भेंडीबाजार, मुंबई मांडवी, महाराष्ट्र-४००००३.

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

दिनांक : २९/११/२०२२

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - शौकतबी अहमद शेख**
**पत्ता- टिनवाला बिल्डींग, १ फ्लोर, रुम नं. ११, २६, याकुब पथ, जे. जे. हॉस्पिटलजवळ, भेंडीबाजार, मुंबई मांडवी, महाराष्ट्र-४००००३.**

## निवडक

### वाहतूक कोंडीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** खारघर परिसरात रोडवर वाहतूक कोंडी करून कपडे विक्री करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर ३०मध्ये रोडवर वाहन उभे करून कपडे विक्री करणाऱ्या समीर पटेल यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रोडवर वाहतूक कोंडी करून सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण केल्याप्रकरणी समीर पटेल यांच्यावर गुन्हा दाखल केला असून अशाप्रकारे कपड्यांची विक्री करणे चुकीचे असून सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केल्यामुळे पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली आहे.

### ऐरोलीत गुणगौरव सन्मान सोहळा



**नवी मुंबई :** परशुराम सेवा संघाच्या वतीने ऐरोली नवी मुंबई येथे गुणगौरव सन्मान सोहळा रविवारी (दि. २७) झाला. ठाणे जिल्हाध्यक्ष अभिषेक समुद्र व कमिटीच्या वतीने ब्राह्मण समाजातील बांधवांना गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाचे उद्घाटक वीज महावितरणचे संचालक विश्वास पाठक तसेच लेखिका, अभिनेत्री राधिका देशपांडे यांच्या हस्ते झाले. परशुराम सेवा संघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष विश्वजित देशपांडे तसेच संघटनेच्या राष्ट्रीय महिलाध्यक्ष अर्चना सरूडकर यादेखील उपस्थित होत्या. कार्याध्यक्ष उपेंद्र जपे हे प्रमुख अतिथी होते. विद्यार्थी, समाजसेवक, उद्योजक, कलाक्षेत्र यामध्ये ज्यांनी उत्तम कार्य केले. त्यांना विविध पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.



**उरण : सामाजिक कार्यकर्ते विजय पवार यांची कन्या प्रियांका व माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते नथुराम जाधव यांचा पुत्र सागर याचा विवाह रविवारी झाला. वधुवरांस शुभ आशीर्वाद देण्यासाठी ज्येष्ठ कार्यकर्ते, ग्राईडवेल परिवार, मांगवली ग्रामस्थ मुंबई मंडळ मांगवली, माजी जिल्हा परिषद सदस्य चारुदत्त पाटील, म्हातवली सरपंच रंजना पाटील, सदस्य महेश घरत, गायक नाट्य कलाकार, पत्रकार आदी उपस्थित होते.**

# मविआ सरकारच्या काळात महिलांवर अत्याचार

## भाजप नेत्या चित्रा वाघ यांचा घणाघात



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडी सरकारच्या काळात महिलांवर अत्याचार झाल्याचा घणाघात भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्ष चित्रा वाघ यांनी केला. यासोबतच हे सरकार लोकांनी लोकांसाठी बसवलेले सरकार असून राज्यातील महिलांची सुरक्षा ही शिंदे- फडणवीस सरकारचे प्राधान्य असल्याचे प्रतिपादनही वाघ यांनी केले.

नवी मुंबई भाजपच्या वतीने सोमवारी (दि. २८) सिडको प्रदर्शनी केंद्रात भव्य महिला विकास मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास चित्रा वाघ आणि आमदार गणेश नाईक यांनी मार्गदर्शन केले. माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी प्रदेशाध्यक्ष वर्षा भोसले, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष दुर्गाताई ढोक, आयटी सेलचे सतीश निकम, माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभापती अनंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आदी उपस्थित होते. सभागृह महिला कार्यकर्त्यांनी खचाखच भरले होते.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात महिला असुरक्षित होत्या, मात्र महिलांवर अत्याचार झाल्यास दोषी पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन शिंदे-फडणवीस सरकारकडून तत्काळ केले जाते. कुणाची हयगय करणार नाही, असे चित्रा वाघ यांनी स्पष्ट केले. खारघर येथील वादग्रस्त आश्रमशाळेत आज चित्रा वाघ जाऊन आल्या असता तो आश्रम आजही सुरू असल्याचे त्यांना दिसून आले. ज्या आश्रमात मुलावर अत्याचार झाले. संबंधित आश्रम चालक तुरुंगात गेला तो आश्रम आजही कोणत्या पालिका अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने सुरू आहे? असा सवाल करून त्यांनी या प्रकरणी आयुक्त राजेश नार्वेकर यांची भेट घेत कारवाई करण्यासाठी सात दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. राज्यात जेवढे पण बेकायदा आश्रम आहेत त्यांची चौकशी करून ते बंद करावेत, अशी मागणी चित्रा वाघ यांनी केली आहे.

### नवी मुंबईत भाजप मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

पंतप्रधान मोदी यांनी जणकल्याणाच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या असून त्याचा लाभ सर्वांना मिळाला आहे. या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे आणि महिलांवर अन्याय होत असताना त्यांच्या मदतीला धावून जाण्याचे आवाहन त्यांनी महिला कार्यकर्त्यांना केले. नवी मुंबईला आकार आणि उकार देण्याचे काम लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी केले असून नवी मुंबई आणि आमदार गणेश नाईक हे नाते अभेद्य आहे.

आमदार गणेश नाईक यांनी मार्गदर्शन करताना देशात पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्व धर्मियांना न्याय मिळत असल्याचे सांगितले. कोरोना काळात नवी मुंबईत जे काही मदतकार्य झाले. त्यामध्ये मदत करणारे ८० टक्के भाजपचे कार्यकर्ते होते. नवी मुंबईत महिला सक्षमीकरणास नेहमीच प्राधान्य दिले असून पालिकेच्या महत्त्वाच्या स्थायी समिती सभापतींच्या मान महिलांना देण्यात आला होता. पालिकेच्या महिला आणि बाल विकास समितीला दिला जाणारा निधी राज्यात सर्वाधिक होता.

जिल्हाध्यक्ष घरत यांनी लोकनेते गणेश नाईक यांनी भाजपत प्रवेश केल्यानंतर नवी मुंबईत भाजप नंबर एकचा पक्ष झाल्याचे नमूद केले. माजी नगरसेविका माधुरीताई सुतार यांनी आपल्या प्रास्ताविकात लोकनेते नाईक यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे नवी मुंबई आज सुखी असून संधी देताना त्यांनी कधीही महिला आणि पुरुष भेद केला नाही, असे म्हटले.

# नेरूळमध्ये मोकळ्या भूखंडावर डेब्रिज; कारवाईची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ येथे एका मोकळ्या असणाऱ्या भूखंडावर डेब्रिज सिडकोच्या दुर्लक्षाने टाकला गेला, पण त्याचे वाईट परिणाम भूखंडालगत राहत असणाऱ्या नागरिकांना भोगावे लागत आहे. यामुळे आता हा भूखंड त्वरित स्वच्छ करावा, अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

नेरूळ सेक्टर ८ मधील मानक रुग्णालयाच्या बाजूला एक छोटाखाणी भूखंड आहे. या सिडकोच्या भूखंडावर डेब्रिज माफियांनी कुणालाही न जुमानता डेब्रिज टाकला, परंतु आता या डेब्रिजवर झाडे वाढली आहेत. तसेच उंदीर घुशींचा सुळसुळाट येथे झाला आहे. तसेच मच्छराचे प्रमाणदेखील तेवढेच वाढले असल्याने भूखंड लगत वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांना याचा फटका बसत आहे. यंदा गणेशोत्सवात या ठिकाणी मनपाच्या अधिकाऱ्यांना चिरीमिरी देऊन या ठिकाणी बेकायदेशीर गणेशमूर्ती विक्री केली होती. विशेष म्हणजे या भूखंडाशिवाय अन्य भूखंडावरदेखील सिडकोचे दुर्लक्ष होत आहे.



नवी मुंबईत एकीकडे रंगरंगोटी करून शहराला सजवायचे काम जोमात चालू आहे, पण दुसरीकडे डेब्रिज शहराला अस्वच्छ काम करण्याची जबाबदारी तेवढ्याच जलदगतीने पार पाडत आहेत.त्यामुळे प्रशासनाने सुंदरतेकडे लक्ष देत असताना बेफिकर वागणाऱ्यावरदेखील द्यावा, अशीही मागणी करण्यात येत आहे.

या मोकळ्या भूखंडाच्या एक बाजूला रस्ता तर इतर बाजूना रुग्णालय तसेच सिडको सोसायट्या आहेत. या ठिकाणी शेकडो नागरिक वास्तव्यास आहेत. तर मानक रुग्णालयातदेखील रुग्णांची रेलचेल नेहमीच चालू असते. त्यांना याचा त्रास होत असून प्रशासनाने यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

> **नेरूळ सेक्टर ८ मधील मानक रुग्णालयाच्या बाजूला असणाऱ्या या सिडकोच्या भूखंडावर अतिक्रमण पथकाला पाठवून पुढील कार्यवाही केली जाईल.**
>
> **-प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको**



# भाजीपाल्याची आवक वाढली

## दरही ५० टक्क्यांनी उतरले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये भाज्यांची आवक वाढली आहे. यात पर राज्यातून येणाऱ्या भाज्यांचे प्रमाणदेखील वाढलं आहे. महाराष्ट्राप्रमाणे गुजरात, मध्य प्रदेशमधून वाटाण्याची आवक होते आहे. आवक वाढल्यामुळे भाज्यांचे दर ५० टक्क्यांनी कमी झाले आहेत. एपीएमसी मार्केटमध्ये भाज्यांच्या ६०० ते ६५० गाड्यांची आवक होत आहे.

गेल्या दीड महिन्यापासून पावसाने उसंत दिल्याने भाजीपाल्याचे, नवीन पिकाचे उत्पादन वाढले आहे. महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, अहमदनगर, सांगली, सातारा भागातून भाज्या येऊ लागल्या आहेत. घाऊक मार्केटमध्ये कोबी आणि फ्लॉवरचे दर पाच ते आठ रुपये किलो तर टोमॅटो १० ते १४ रुपये किलोवर आले आहेत. थंडीत वातावरण चांगले असल्याने भाज्यांचे भाव आता स्थिर राहणार असून पालेभाज्यादेखील स्वस्त झाल्या आहेत. गेल्या काही महिन्यांपासून गगनाला भिडणारे भाज्याचे दर आवाक्यात आल्यामुळे सर्वसामान्यांनीदेखील सुटकेचा निश्वास सोडला आहे.

परतीच्या पावसाने राज्यात थैमान घातले होते, याचा मोठा फटका शेतकऱ्यांच्या पिकांना बसला होता. परिणामी शेतकरी संकटात सापडला. भाजीपाल्याची आवक घटल्याने भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत. पावसामुळे काढणीला आलेल्या भाज्या पूर्णपणे खराब झाल्या. शेतीचे मोठे नुकसान झाल्यामुळे भाज्यांचे दर कडाडले होते. मुंबईतल्या भाजी मार्केटमध्ये राज्यभरात कोसळलेल्या पावसामुळे आवक ५० टक्क्यांनी घटली होती. शिवाय नाशिक, पुणे, गुजरातहून भाज्या घेऊन येणाऱ्या गाड्या कमी झाल्या होत्या. पावसामुळे अनेक भाज्या खराब झाल्या होत्या परिणामी भाज्यांचे दर ४० टक्क्यांनी वाढले होते, परंतु आता दरांमध्ये ५० टक्क्यांची घसरण झाल्यामुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**एपीएमसीमधील भाज्यांचे दर प्रति किलो**

**वाटाणा - ५० ते ६०**
**टोमॅटो - १० ते १४**
**फ्लॉवर - ५ ते ८**
**कारली- १४ ते १६**
**कोबी - ५ ते ८**
**दुधी - १० ते १२**
**वांगी - १० ते १२**
**काकडी - १२ ते १४**
**भेंडी - २५ ते ३२**
**फरसबी - ३० ते ४०**
**गाजर - ३० ते ३५**
**सिमला - २० ते ३०**

**पालेभाजी प्रति जुडी दर**

**मेथी - १० ते १२**
**शेपू - १० ते १२**
**कोथिंबीर - ८ ते १०**
**पालक - ५ ते ७**
**कांद्याची पात - १०**

# उद्यानांतील खेळणी दुरुस्त करा

## पांडुरंग आमले यांची मागणी





**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर ७ मधील महापालिका उद्यानांतील तुटलेल्या झोपाळ्यांची डागडूजी तत्काळ करण्याची मागणी भाजपचे सानपाडा नोडमधील युवा नेते व अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांना एक निवेदन दिले आहे.

सानपाडा हा नोड पूर्णपणे अल्प, अत्यल्प व मध्य उत्पन्न गटातील रहीवाशांचे निवासी वास्तव्य असलेला परिसर आहे. हा नोड किमान ८० टक्के सिडको वसाहतींचा आहे. सानपाडा सेक्टर सातमध्ये नवी मुंबई महापालिकेची संत शिरोमणी महाराज उद्यान आणि कै. सिताराम महाराज उद्यान आहे. या दोन्ही उद्यानात सकाळी व सायंकाळी मोठ्या संख्येने स्थानिक रहिवासी आपल्या मुलांसह येत असतात. गेल्या काही महिन्यांपासून या दोन्ही उद्यानातील झोपाळे पूर्णपणे तुटलेले असून लहान मुलांना या झोपाळ्यांचा खेळण्यासाठी वापर करत येत आहे.

झोपाळ्याअभावी लहान मुलांची गैरसोय होत आहे. आता केवळ त्या ठिकाणी झोपाळ्याचे सांगाडेच उरले आहेत. त्यामुळे सानपाडा नोडमधील मुलांची गैरसोय टाळण्यासाठी संबंधितांना लवकरात लवकर झोपाळ्यांची दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्याची मागणी पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.



# ज्येष्ठांकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील मुळेखंड, तेलीपाडा, कुंभारवाडा व कोळीवाडा आणि परिसरातील ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी वर्धापन दिन मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष प्रकाश पांडुरंग म्हात्रे, कार्याध्यक्ष अनंत लक्ष्मण पाटील, सचिव भालचंद्र जनार्दन म्हात्रे, सह सचिव परशुराम बुधाजी पाटील, खजिनदार ईश्वर बाळकृष्ण म्हात्रे, रामचंद्र भाई म्हात्रे, सुभाष दामोदर गुरव, गजानन हरी म्हात्रे, रमेश रामचंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र दत्तू म्हात्रे आदींनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

यानिमित्ताने सत्यनारायणाची पूजा ही आयोजित करण्यात आली होती. या वेळी मंडळाच्या नूतन कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# गव्हाण विद्यालयात महात्मा ज्योतिबा फुलेंना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्त्री शिक्षणाचे उद्धारकर्ते महान समाज सुधारक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये त्यांना स्मृतीवंदना करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे उपशिक्षक आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर आणि अन्य अध्यापकांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या वेळी सर्व अध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाच्या सहायक हर्षला पाटील यांनी केले.



# सरसोळे मैदानावर क्रिकेट सामन्यांना बंदी घालावी; मनोज मेहेर यांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सरसोळे मैदानावर क्रिकेट सामन्यांना बंदी घालावी, अशी मागणी भाजपचे माजी प्रभाग समिती सदस्य मनोज मेहर यांनी केली आहे.

सारसोळे सेक्टर १२ येथे नवी मुंबई महापालिकेचे श्री गणेश रामलीला मैदान आहे. या मैदानावर नेहमीच क्रिकेटचे सामने आयोजित केले जातात, परंतु क्रिकेट खेळताना अंतर्गत वाद निर्माण होऊन आपआपसांत मतभेद होऊन भांडणे होतात. भविष्यात याच भांडणांचा उद्रेक होऊन एखादा निष्पाप जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती मनोज मेहर निवेदनात व्यक्त केली आहे.

यासोबतच वादविवादसारख्या घटना टाळायच्या असतील तर मैदानावर कोणत्याही संघास क्रिकेट सामने आयोजित करण्याची परवानगी देऊ नये, अशी मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.